हरि ॐ

श्री गुरुस्तुति पुस्तकाचा थोडक्यात भावार्थ असा -

श्री गुरुस्तुति ही इंद्रवज्रा वृत्तामध्ये लिहिली गेली आहे. हे स्फुरलेले वाङमय असून याची देवता श्री सद्‌गुरु आहे. भगवान दत्तात्रेयांच्या सगुण रुपातील दर्शनाचा ध्यास घेतलेल्या तुकाराम नावाच्या भक्ताला प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या देहात त्यांचे दर्शन झाले. हा दर्शनरुपी गुरुप्रसाद त्या भक्ताला लाभल्यानंतर सगुण देहातील निर्गुण तत्त्वाचे म्हणजेच सद्‌गुरुतत्त्वाचे वर्णन ह्या श्री गुरुस्तुतिमध्ये स्वामीमहाराजांनी केले आहे.

निर्गुण हे सगुण होऊ शकत नाही, किंबहुना ते तसे झाले, तर निर्गुण हे निर्गुण नव्हते असे म्हणावे लागते. परंतु तरीही, एकनिष्ठ भक्तांना आपापल्या इष्ट देवतेच्या दर्शनाचा अनुभव येत असतो. याचाच अर्थ असा की, निर्गुण हे निर्गुणच राहते. ते केवळ सगुणाच्या आधारे प्रकट होते. म्हणजेच निर्गुण आणि सगुण हे परस्परविरोधी नाहीत तर परस्परपूरक आहेत. 'सगुणाचेनि आधारे, निर्गुण पाविजे निर्धारे' असे समर्थांनी म्हटल्याप्रमाणे निर्गुणतत्त्वाच्या प्राप्तीसाठी म्हणूनच सगुणाची उपासना आवश्यक ठरते. मात्र त्याकरीता पंचमहाभूतांमध्ये बंदिस्त असलेल्या सगुणातील निर्गुण तत्त्वाच्या अस्तित्वाचे अनुसंधान ठेवून त्याची उपासना करता आली पाहिजे. नेमकी हीच साधनप्रणाली 'श्री गुरुस्तुति : संपूर्ण अर्थ व विवेचन' या पुस्तकात प्रतिबिंबीत झाली आहे.

जे त्रिकालाबाधित सद्‌गुरुतत्त्व आहे, तेच शाश्वत, अविकारी आहे. माझे शरीर म्हणजे मी नसून आत्मा म्हणजे मी आहे, असे आत्मज्ञान करुन देणाऱ्या सद्‌गुरुंशी 'येथे साक्षात गुरुतत्त्व विराजमान आहे' अशा भावपूर्ण श्रद्धेने अनुसंधान ठेवणे म्हणूनच आवश्यक ठरते. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति अशा तिन्ही अवस्थांचे निरीक्षण साक्षी भावाने करणारा साक्षात दत्त आहे. तेच सद्‌गुरुतत्त्व असून जळी - स्थळी सर्वत्र व्यापून दशांगुळे उरलेले आहे, जे अविनाशी आहे. त्याच्या स्वतेजाच्या सामर्थ्यामुळे शिष्याला अस्तित्त्व प्राप्त होतं आणि ज्ञानानेच त्याच्या स्वरुपाची खरी ओळख पटते. अदृश्य रुपातील सद्‌गुरुतत्त्व हे गुरुप्रसादाशिवाय प्राप्त होत नाही. असा गुरुप्रसाद म्हणजेच गुरुकृपा होण्यासाठी प्रथम आपल्यातील 'अपार्थपणा' काढून टाकता आला पाहीजे म्हणजेच आपल्या मनातील खेद, बुद्धीतील भेद आणि चित्तातील एषणांचा (इच्छांचा) त्याग करता आला पाहीजे, संपूर्ण विश्वासाने, अहंकार शून्यतेने आणि शरणागतिने सद्‌गुरुंना शरण गेले तर ते सद्‌गुरुतत्त्व अनुकूल होतं व जिथे सुख-दुःख नाही अशा चिन्मात्रपदाचा मार्ग सुकर होतो. सर्व इच्छांचे व संकटांचे हरण करण्यासाठी माझा सद्‌गुरु समर्थ आहे. तो पूर्ण आहे, तो आनंद आहे आणि दुसऱ्याला समर्थ करणारा असा स्वतः समर्थ आहे, हा अर्थ समजून घेऊन जो या श्री गुरुस्तुतिचे पठण करेल त्याच्या आधि-व्याधी दूर होऊन पापनाशही होईल. असा गर्भितार्थ थोरल्या स्वामी महाराजांनी 'श्री गुरुस्तुति' त सूचित केला आहे.

प. प. वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज विरचित श्री गुरुस्तति ही गाणगापुर इथे लिहिली गेली आणि सन २०१० च्या गाणगापुर यात्रा उत्सवाचे औचित्य साधून श्री गुरुस्तुति पुस्तकाचा प्रकाशन सोहळा श्री सद्‌गुरु वासुदेव वामन बापट गुरुजी यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

स्तोत्राच्या आणि पुस्तकाच्या नावातच फक्त साधर्म्य नसून ते रचणाऱ्या स्वामी महाराजांच्या आणि लेखकाच्या नावातही आहे, हा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल.

प्रकाशनाच्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले दैनिक सामनाचे कार्यकारी उपसंपादक श्री. संजय डहाळे यांनी पुस्तकाबद्दल आणि श्री सद्गुरुंनी घातलेली अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यांनी अवघ्या अडीच तासात हे पुस्तक वाचून आणि 'The Monk Who Sold His Ferrari' या इंग्रजी पुस्तकाशी तुलना करुन, श्री गुरुस्तुति ही जणू त्या पुस्तकात उपस्थित केलेल्या प्रश्नांना दिलेलं उत्तर आहे, अशा शब्दांत आपली उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली.

श्री सद्गुरु हे समाजाच्या हिताच्या दृष्टीने त्यांच्या स्वतेजाच्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकाने आपला उद्धार साधून घ्यावा यासाठी, तसेच समाजात योग्य तो मानसिक बदल व्हावा यासाठी ते सतत कार्यरत असतात. त्याचाच एक भाग म्हणजे उद्बोधक अशा श्री गुरुस्तुति पुस्तकाचे प्रकाशन होय.

सर्वत्र ठायी ठायी भरून राहिलेल्या या सद्गुरुतत्त्वाशी संपूर्ण शरणागतिने नतमस्तक होऊन आणि श्री गुरुस्तुतिचा मथितार्थ समजून त्याचे पठण करून थोरल्या स्वामी महाराजांनी आश्वासन दिलेल्या चिन्मात्रपदाकडे वाटचाल सुनिश्चित करण्याचा संकल्प करुया.

हरि ॐ